महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय पाध्ये (jeevandeepvartanews2020@gmail.com) मुख्य संपादक : श्री. रविंद्र चोरगेवरे

शुक्रवार ❖ १२ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६४ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

हृदयाच्या दुर्लभ आजाराने त्रस्त ३४ वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार

मुंबईतील ही पहिली शस्त्रक्रिया लीलावती रूग्णालयात पडली पार

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

मल्टिपल एन्युरिझम ऑफ सायनस ऑफ वलसाल्वा या गंभीर हृदयविकाराने त्रस्त महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात राहणारी ३४ वर्षीय महिलेवर मुंबईतील लीलावती रुग्णालयात यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. लीलावती हॉस्पिटल चे हृदयरोग शल्यचिकित्सक डॉ.पवन कुमार यांच्या नेतृत्वाखाली हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नितीन गोखले आणि हृदयविकारतज्ज्ञ डॉ. नम्रता कोठारी यांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. मुंबईत एकापेक्षा अधिक एन्युरिझम्स ची पहिल्यांदाच ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

सीमा पाटील (३४) या महिलेला श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांची प्रकृती खालावलेली पाहून कुटुंबीयांनी त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीत हृदय नीट काम करत नसल्याचे समोर आले.

इकोकार्डियोग्राम आणि सीटी स्कॅनसह इतर वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. यामध्ये महिलेला मल्टीपल एन्युरिझम ऑफ सायनस ऑफ वलसाल्वा या गंभीर आजाराचे निदान झाले. पुढील उपचारासाठी डॉक्टरांनी महिलेला लीलावती रूग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला.लीलावती रूग्णाल या तील कार्डिओव्हस्कुल सर्जन डॉ. पवन कुमार म्हणाले की, 'लीलावती रूग्णालायतील वैद्यकीय तपासणीत दोन एन्युरिझमचे निदान झाले. एक वलसाल्वा च्या डाव्या कोरोनरी सायनसमध्ये (४.५ x ३.५ x ३ सेमी मोजमाप) आणि दुसऱ्या वलसाल्वा च्या उजव्या कोरोनरी सायनमधअये आखणी एक एन्युरिझम (३.५ x २.५ x २.५ सेमी मोजमाप) होते. सायनस ऑफ वलसाल्वा (एएसओव्ही) हा एक अत्यंत दुर्मिळ हृदयरोग आहे. ज्याचे प्रमाण सामान्य लोकांमध्ये ०.०९% आणि जन्मजात हृदय दोषांचे ०.१% - ३.५% आहे. मल्टिपल एन्युरिझम ऑफ सायनस ऑफ वलसाल्वा प्रामुख्याने ७० प्रकरणांमध्ये उजव्या कोरोनरी सायनसमधअये तर २५% प्रकरणांमध्ये नॉन-कोरोनरी सायनसपासून आणि क्वचितच डाव्या कोरोनरी सायनसमध्ये आढळतात. जगभरात अशा प्रकारची केवळ १८ प्रकरणे नोंदवली गेली आहेत तर सहा प्रकरणे भारतात नोंदवली गेली आहेत तर अशा चार प्रकरणांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. परंतु, मुंबईतील हे पहिलेचं प्रकरण आहे.डॉ. कुमार पुढे म्हणाले की, ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया सात तास चालली. या शस्त्रक्रियेमध्ये डाव्या कोरोनरी सायनस एन्युरिझमची दुरुस्ती करणे हे डाव्या कोरोनरी धमनीच्या जवळ असल्यामुळे एक अत्यंत आव्हानात्मक होते. उजवीकडील कोरोनरी सायनस एन्युरिझम बंद करत महाधमनी झडप बदलण्यात आली. या पध्दतीमुळे महाधमनी झडप सुरक्षितपणे बदलण्यात आली आणि डाव्या सायनस ऑफ वलसाल्वा (एएसओव्ही) ची दुरुस्ती करण्यात आली. या शस्त्रक्रियेनंतर रूग्णाच्या प्रकृतीत सुधारणा पाहून त्याला घरी सोडण्यात आले.

रूग्ण सीमा पाटील म्हणाल्या की, 'हृदयाचा गंभीर आजार झाल्याचे निदान झाल्यानंतर मी खूप घाबरली होती. मी जगण्याची आशा सोडून दिली होती. मात्र लीलावती रुग्णालयाच्या डॉक्टरांनी माझ्यावर उपचार करून मला नवजीवन दिले. आता मी पूर्वीपेक्षा खूप बरी आहे. मला नवीन आयुष्य दिल्याबद्दल मी डॉक्टरांच्या टीमची खूप आभारी आहे.'